**MHKO070021992019**

## फौजदारी किरकोळ अर्ज क्रं.२९०/२०१९ मधील नि.क्र.१ वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार याने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४५१, ४५७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

०२) अर्जदाराचे म्हणणे असे की, अर्जदार यांचे मालकीचा अ) लापोक्स अल्ट्रा कंपनीचे फरशी चिकटवणेचे लिक्वीडचे प्रत्येकी १० प्लॅस्टीकचे डबे, ब) मंगलम कंपनीचा वेल्डींग रॉड्स एक बॉक्स, क) टायलो बॉण्ड कंपनीचे एक किलो वजनाचे १९ बॉक्स, ड) सनफलॉवर कंपनीचे फरशी कटींग मशीन, इ) देववाल्ट कंपनीचे फरशी कटींग मशीन हा त्यांच्या मालकीचा असून (यापुढे संक्षेपाकरिता 'सदर मुद्देमाल' असा उल्लेख केला आहे.) तो शिरोळ पोलीस ठाणे गु.र.क्र.४८१/२०१९ (भा.दं.सं.कलम ४५४, ४५७, ३८०) या गुन्हयाचे कामी पोलीसांनी जप्त केलेला आहे. सदरहू जप्त मुद्देमाल हा चोरीस गेलेला असून त्याबाबत अर्जदार यांनी दि.२१/११/१९ रोजी शिरोळ पो. ठाणेकडे फिर्याद दिली आहे. अर्जदार हे फरशी विक्रीचा व्यवसाय करीत असून त्यांना सदर मुद्देमालाची अर्जदार यांना कायम गरज असते. सदर मुद्देमाल हा पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास अर्जदार यांचे आर्थीक नुकसान होणार आहे. त्यामुळे सदर मुद्देमाल हा योग्य त्या अटी व शर्ती घालुन सुपुर्दनाम्यावर अर्जदारास परत करणेची विनंती केलेली आहे.

०३) तपासी अंमलदाराचे म्हणणे (नि.क्र.४) पाहिले व वाचले. त्यांनी सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांना योग्य त्या अटीं व शर्तीवर परत देणेस हरकत नाही असे म्हणणे दिले आहे. मा.सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी जप्त मुद्देमाल हा पुराव्यासाठी महत्वाचा असून सदर मुद्देमाल अर्जदारास परत केल्यास त्यांची अर्जदाराकडून विक्री किंवा तबदील होण्याची शक्यता आहे. तरी अर्जदाराचा मुद्देमाल मागणीचा अर्ज नामंजूर करावा असे म्हणणे सादर केले.

०४) अर्जदार यांनी शिरोळ पोलिस ठाणे गु.र.नं.४८१/२०१९ ची एफ.आय.आर ची प्रत (नि.क्र.३/१) वर दाखल केलेली आहे.

**०५)** सदर जप्त मुद्देमाल अर्जदाराव्यतिरीक्त इतर कोणीही मागणी केलेली नाही आणि अर्जदार यांनी त्यांचा प्रथमदर्शनी मालकी हक्क दर्शविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत गुन्हयाची फिर्याद ही अर्जदार यांनीच दिलेली आहे. तसेच जप्ती पुर्वी मुद्देमाल हा त्यांच्या कायदेशीर कब्जामध्ये असल्याचे कथन केले आहे. प्रस्तुत खटला चालण्यास बराच वेळ लागण्याची शक्यता आहे. सदरचा मुद्देमाल हे पोलीस ठाण्यामध्ये पडुन राहिल्यास वापर न केल्यामुळे ते खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्जदार सदर जप्त मुद्देमालाचे मालक असल्याने व ते त्यांच्या वापरातील असल्याने सदरहू जप्त मुद्देमालाचा ताबा आवश्यक त्या अटी घालुन त्यांना देणे योग्य व न्यायोचित होणार आहे. सबब वर नमूद कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) पोलीस निरीक्षक, शिरोळ पोलीस ठाणे यांना निर्देशीत करण्यात येते की, शिरोळ पोलीस ठाणे गु.र.क्र.४८१/२०१९ (भा.दं.सं.कलम ४५४, ४५७, ३८०) मधील जप्त मुद्देमाल अ) लापोक्स अल्ट्रा कंपनीचे फरशी चिकटवणेचे लिक्वीडचे प्रत्येकी १० प्लॅस्टीकचे डबे, ब) मंगलम कंपनीचा वेल्डींग रॉड्स एक बॉक्स, क) टायलो बॉण्ड कंपनीचे एक किलो वजनाचे १९ बॉक्स, ड) सनफलॉवर कंपनीचे फरशी कटींग मशीन, इ) देववाल्ट कंपनीचे फरशी कटींग मशीन याचा अंतरीम ताबा अर्जदार श्री.चोथमल बिरुदाराम चौधरी, वय.२३, रा.नृसिंहवाडी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांना रु.१०,०००/- (रक्कम रुपये दहा हजार फक्त) चे सुपुर्तनाम्यावर पुढील अटीवर देण्यात यावाः- **अ)** अर्जदाराने सदर जप्त मुद्देमालाचे स्वरुप बदलण्याचे नाही अगर विक्री करण्याचे नाही. **ब)** अर्जदाराने सदर जप्त मुद्देमालचे शिरोळ पोलीस ठाणे गु.र.क्र. ४८१/२०१९ (भा.दं.सं.कलम ४५४,४५७, ३८०) चे कामी न्यायालयाचे आदेशानुसार हजर करण्याचे आहे.

२) सदरील जप्त मुद्देमाल अर्जदारास देताना त्याचा सविस्तर पंचनामा करण्याचा आहे आणि सदर सुपुर्दनामा व पंचनामा दोषारोप पत्रासोबत न्यायालयात दाखल करण्याचा आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Vishwas Pandurang Shinde
Date: 2019.11.30 00:28:14 +0530

दि.२९/११/२०१९. (विश्वास पां. शिंदे)

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जयसिंगपूर.